# महिला/बालके व जेष्ठ नागरिक यांचे हक्क व अधिकार

## माहिती पुस्तिका

# अनुक्रमणिका


| अनु.क्र | प्रकरण | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ०१ | कायदे विषयक थोडक्यात माहिती | ६ ते १७ |
| ०२ | महिलांचे हक्क व अधिकार | १८ ते २१ |
| ०३ | बालकांचे हक्क व अधिकार | २२ ते २४ |
| ०४ | जेष्ठ नागरिकांचे हक्क व अधिकार | २५ ते २७ |
| ०५ | एफ.आय.आर कुठे व कसा नोंदवावा ? | २८ ते ३२ |
| ०६ | महिला/बालके व जेष्ठ नागरिक यांचे करिता राबविण्यात येणारे उपक्रम | ३३ ते ४१ |
| ०७ | संपर्क कुठे साधावा? | ४२ |

# भूमिका

१ ऑक्टोबर २०२० रोजी मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाची सुरुवात झाली. आयुक्तालय सुरु झाल्यापासून अनेक नव-नवीन उपक्रम राबवण्याचा प्रयत्न आम्ही केलेला आहे.

समाजातील सर्वांचे विशेषत: महिला/बालके व जेष्ठ नागरिक यांच्या हितांचे संरक्षण करून या देशाच्या कायद्यांची नि:पक्षपातीपणे अंमलबजावणी करून मिरा-भाईंदर, वसई-विरार शहर हे एक सुरक्षित शहर बनविण्याकरिता तसेच समाजातील दुर्बल घटकांच्या निकोप वाढीसाठी व विकासासाठी अनुकूल व भयमुक्त वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने आम्ही सतत प्रयत्नशील आहोत.

महिला, बालके व जेष्ठ नागरिक यांची सुरक्षितता ही पोलीसांसाठी महत्त्वाची जबाबदारी आहे. पोलीस ठाण्यात महिला येताना अतिशय संकोचून येतात. त्यांचे म्हणणे कसे, कुणासमोर मांडावे याबाबत त्यांना अनेक प्रश्न असतात. महिलांमध्ये कायदयाबाबत जागरूकता निर्माण व्हावी, पोलीस ठाणेत तक्रार देण्याकरिता येताना त्यांनी विश्वासाने यावे या करिता आम्ही वेगवेगळे उपक्रम राबवलेले आहेत. या उपक्रमांची माहिती तसेच महिलांविषयक कायदयाची संपूर्ण माहिती एका ठिकाणी उपलब्ध व्हावी या करिता भरोसा सेलच्या प्रमुख स.पो.नि तेजश्री शिंदे यांनी "महिला/बालके व जेष्ठ नागरिक यांचे हक्क व अधिकार- माहिती पुस्तिका" ही संकलित केली आहे. सपोनि शिंदे आणि त्यांच्या सहका-यांचे हया कामासाठी हार्दिक अभिनंदन!

सदर माहिती पुस्तिकेमध्ये महिला/बालके व जेष्ठ नागरिक यांचे कायदे, त्यांचे हक्क व अधिकार, येणा-या समस्या व संपर्क कोठे साधावा या संदर्भात सविस्तर माहिती या पुस्तिकेमध्ये समाविष्ठ करण्यात आलेली आहे. हया पुस्तिकेत काही सुधारणा सुचवायच्या असल्यास कृपया ***bharosacell.mb-vv@mahapolice.gov.in*** या ईमेल आयडी वर त्या पाठवाव्यात. सर्व सुचनांचे निश्चितपणे स्वागत आहे.

सदरची पुस्तिका ८ मार्च "महिल दिन" याचे औचित्य साधून सर्व महिलांना समर्पित करण्यात येत आहे.

सदानंद दाते
पोलीस आयुक्त
मि.भा.व.वि आयुक्तालय

# १. कायदे विषयक थोडक्यात माहिती

- **<u>भारतीय दंड संहिता १८६० मधील महिलांविषयक अपराध :-</u>**

कलम ३१२- गर्भस्त्राव घडवून आणणे.

कलम ३१३- स्त्रीच्या संमतीशिवाय गर्भस्त्राव घडवून आणणे.

कलम ३१४- गर्भस्त्राव घडवून आणण्याच्या उद्देशाने केलेल्या कृतीमुळे मृत्यू घडून येणे.

कलम ३५४- स्त्रीचा विनयभंग करण्याचे उद्देशाने तिच्यावर हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करणे.

कलम ३५४(अ)- लैंगिक छळवणूक आणि लैंगिक छळवणूकीसाठी शिक्षा.

कलम ३५४(ब)- स्त्रीला विवस्त्र करण्याच्या उद्देशाने हिंस्त्र हल्ला करणे किंवा गुन्हेगारी बलप्रयोग करणे.

कलम ३५४(क)- स्त्रीच्या अवयवाकडे बघून/नैसर्गिक कृती करताना बघून लैंगिक समाधान मिळवणे.

कलम ३५४(ड)- स्त्रीचा पाठलाग करणे (**Stalking**)

कलम ३६६- विवाह इत्यादीची सक्ती करण्यासाठी स्त्रीचे अपनयन करणे किंवा अपहरण करणे किंवा तिला प्रलोभित करणे.

कलम ३६६(अ)- अज्ञान मुलगी अनैतिक कृत्यासाठी मिळविणे.

कलम ३६६(ब)- परकिय देशांतून मुलींची आयात करणे.

कलम ३७६- बलात्कारासाठी शिक्षा

कलम ३७६(अ)- बलात्कारित स्त्रीच्या मृत्यूस इ. कारणीभूत होणाऱ्या व्यक्तीस शिक्षा

कलम ३७६(ब)- फारकतीच्या काळात नवऱ्याने आपल्या पत्नीशी लैंगिक संभोग करणे.

कलम ३७६(क)- अधिकार पदावर असताना (हवालातील ताब्यात,परिसरात हजर) असलेल्या स्त्रीशी लैंगिक संभोग करणे.

कलम ३७६(ड)- सामुदायिक बलात्कार (गैंग रेप)

कलम ३७६(इ)- पुन: पुन्हा बलात्काराचा गुन्हा करणाऱ्यांना शिक्षा.

कलम ३७७- अनैसर्गिक अपराध.

कलम ४९३- एखादया पुरूषाने कायदेशीर विवाह झाल्याचा समज लबाडीने स्त्रीच्या मनात निर्माण करून तिच्यासोबत पती-पत्नीप्रमाणे सहवास घडवून आणणे.

कलम ४९४- पती किंवा पत्नी हयात असतानाच्या काळात पुन्हा विवाह करणे.


कलम ४९८- गुन्हेगारी उद्देशाने विवाहित स्त्रीस भुरळ पाडून नेणे किंवा पळवून नेणे किंवा अडकवून ठेवणे.

कलम ४९८(अ)- एखादया स्त्रिच्या पतीने किंवा नातेवाईकांनी तिला क्रूर वागणूक देणे.

कलम ५०९- स्त्रीचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने शब्दोच्चार, हावभाव किंवा कृती करणे.

- वरीलप्रमाणे भारतीय दंड संहिता १८६० मध्ये महिलांसोबत कोणत्याही स्वरूपाचा अपराध घडला, लैंगिक अपराध घडला, छेडछाड झाली तर त्या तात्काळ पोलीस ठाणेत जावून त्यांची तक्रार नोंदवू शकतात.

## हुंडा प्रतिबंध अधिनियम १९६१



कलम ३- या कायद्यान्वये हुंडा देणे अगर घेणे किंवा देण्या-घेण्यास अपप्रेरणा देणे हा गुन्हा आहे. याकरिता किमान ५ वर्षे कारावास आणि द्रव्यदंड किंवा हुंडयाची रक्कम यापैकी जास्त रक्कम शिक्षा आहे.

कलम ४- हुंडा मागण्याच्या उद्देशाने वधु/वर यांचे मातापिता किंवा इतर नातेवाईकांकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे हुंडा मागणे हा या कायदयाने गुन्हा आहे.

## अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम १९५६




- या कायदयान्वये-

कलम ४- स्त्रीला वेश्याव्यवसाय करण्यास लावून त्यातून मिळणाऱ्या कमाईवर स्वत:ची उपजिवीका चालवणे गुन्हा आहे.

कलम ५- व्यक्तीला वेश्याव्यवसाय करण्यासाठी पुरवठा करणे, फूस लावणे व घेवून जाणे हा गुन्हा आहे.

कलम ६- जेथे वेश्याव्यवसाय चालतो त्या जागेत व्यक्तीला अडवून ठेवणे गुन्हा आहे.

कलम ७- सार्वजनिक ठिकाणाजवळ वेश्या व्यवसाय करणे गुन्हा आहे.

# कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम २००५




कलम- २ (फ) – कौटुंबिक नातेसंबंध

रक्ताचे संबंध, विवाहाचे संबंध किंवा विवाहाच्या किंवा दत्तकाचे स्वरूपाचे संबंधाने संबंधीत असतांना बरोबरीने घरात एकत्र रहात आहे किंवा विशिष्ट वेळी एकत्र रहात होत्या अशा किंवा एकत्र कुटुंब म्हणून एकत्र असलेल्या कुटुंबाचे सदस्य असलेल्या दोन व्यक्तींमधील नाते संबंध.

कलम ३- कौटुंबिक हिंसाचार –एखादया व्यक्तीचा तिच्या घरामध्ये हेतूपुर्वक शारीरिक, लैंगिक, तोंडी किंवा भावनात्क छळ, आर्थिक छळ तिच्या कुटुंबातील सदस्यांकडून होत असतील तर त्यास  कौटुंबिक हिंसाचार असे म्हणतात.

कलम ४- अन्वये कोणतीही व्यक्ती ज्याला कौटुंबिक छळाबद्दल माहिती असल्यास तो त्याबाबत संरक्षण अधिकाऱ्याला, सेवा पुरविणाऱ्यांना कळवू शकतो तसेच या कायदयाखाली कोणतीही पीडित महिला स्वत: सरळ पोलीस स्टेशनमध्ये/दंडाधिकाऱ्याकडेही तोंडी किंवा लेखी तक्रार दाखल करू शकते.

कलम ५- पोलीस अधिकारी, सेवा पुरविणारे व न्याय दंडाधिकारी यांपैकी कोणीही एखादे कौटुंबिक छळाचे प्रकरण त्यांच्या नजरेस आल्यास पुढील कारवाई करू शकतात-

➢ पीडित महिलेस संरक्षण अधिका-याकडे करावयाचे अर्जाची माहिती देणे.

➢ संरक्षण देणे.

➢ ताबा आदेश

➢ निवारा आदेश

➢ आर्थिक विषयक आदेश

➢ नुकसान भरपाई आदेश इ. आदेश या कायदयान्वये न्यायालयातून मिळवता येतात याची तिला माहिती देणे.

- सेवा अधिकारी कडून सेवा पुरविणा-या संस्थेची व सेवेची माहिती.
- संरक्षण अधिका-याकडून देण्यात येणा-या सेवेची माहिती.
- विधी सेवा प्राधिकरणाकडून मोफत सल्ला मिळविण्याची माहिती.
- भारतीय दंड संहिता कलम ४९८(अ) अन्वये तिला तक्रार करता येवू शकते याची माहिती तिला देणे कायदयाने बंधनकारक आहे.

कलम ६- पीडित महिलेला आधारगृहामध्ये तातडीचा आश्रय घेण्याची गरज असल्यास तिला आधार गृहात आश्रय दिला जाईल. यासाठी संरक्षण अधिका-याने किंवा सेवा पुरविणा-या संस्थेने पिडीत महिलेला आश्रय गृहामध्ये आसरा देण्याची कार्यवाही करावी.

कलम ७- वैदयकिय सुविधा- या कलमाअन्वये पिडीत व्यक्ती किंवा तिच्यावतीने संरक्षण अधिकारी सेवा पुरविणारे हे वैद्यकिय सेवा पुरविणा-या संस्थेला पिडीत व्यक्तीला सेवा पुरविण्याची विनंती करतील. त्यानुसार तिला तात्काळ सेवा पुरवली जाईल.

# कामाच्या ठिकाणी, महिलांची लैंगिक छळवणूक करण्यास (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३



**कलम- ३ – लैंगिक छळवणूकीस प्रतिबंध-**

कोणतीही महिला कामाच्या ठिकाणी लैंगिक छळास बळी पडणार नाही.

जर- महिलेच्या नोकरीमध्ये तिला भेदभावकारी वागणूक दिली जात असेल, नोकरी वरुन काढण्याची धमकी दिली जात असेल, तिच्या कामामध्ये हस्तक्षेप करणे, तिला भिती दाखवून धमकावणे, कामाच्या ठिकाणी तिच्यासाठी प्रतिकूल परिस्थिती निर्माण करणे, तिला हिन वागणूक दिली जात असेल तर त्यास लैंगिक छळवणूक समजण्यात येईल.

**कलम ४- अंतर्गत तक्रार समिती स्थापित करणे.**

कामाच्या ठिकाणी लेखी आदेशाव्दारे अंतर्गत तक्रार समिती स्थापन करण्यात येईल. सदर ठिकाणी वरिष्ठ पदावर असलेली महिला ही मुख्य सदस्य असेल, इतर दोन महिला सदस्य, महिलांच्या कामाशी निगडीत असलेले/कायदेतज्ञ, एक सदस्य महिलांच्या कामाशी निगडित असलेली सामाजिक कामाचा अनुभव असलेली इ. सदस्यांची नेमणूक अंतर्गत तक्रार समिती मध्ये करण्यात येईल.

**कलम ६- स्थानिक तक्रार समिती स्थापित करणे व तिची अधिकारीता**

१० पेक्षा कमी कामगार असलेल्या आस्थापनांमध्ये अंतर्गत तक्रार समिती स्थापित करण्यात आली नसेल व तक्रार स्वत: मालकाविरूद्ध असेल तर जिल्हाधिकारी जिल्हयासाठी स्थानिक तक्रार समिती स्थापन करेल.

**कलम ७- लैंगिक छळवणुकीची तक्रार-**

पीडित महिला कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाची लेखी तक्रार घटनेच्या तारखेपासून/ घटनेच्या शेवटच्या तारखेपासून ३ महिन्याच्या आत जर अंतर्गत समिती नसेल तर स्थानिक समितीकडे करेल.

लेखी स्वरूपात तक्रार करण्याकरीता मुख्य अधिकारी मदत करेल.

जर- पीडित महिलेचा अक्षमतेमुळे मृत्यू झाला किंवा तक्रार करण्यास अक्षम ठरली तेव्हा तीचा कायदेशीर वारस तक्रार करेल.

## मुस्लिम महिला (अधिकार व संरक्षण) कायदा २०१९

- कलम ३-४ - या कायदयान्वये तलाक, तलाक, तलाक असे तीनदा म्हणणे, लिहून देणे, एस.एम.एस करणे, व्हॉटस्‌ॲप वर पोस्ट करणे किंवा अन्य कोणत्याही मार्गाने सांगणे बेकायदा असुन तसे केल्यास मुस्लिम पतीस ३ वर्षे कारावासाची शिक्षेची तरतूद दिलेली आहे.

- ज्या विवाहीत मुस्लिम स्त्रीवर तलाकचा उच्चार केला जातो ती तिच्या पतीकडून तिच्यासाठी आणि ताब्यातील अल्पवयीन मुलांसाठी निर्वाह भत्ता घेण्यास पात्र असेल.

- या कायद्यान्वये मुस्लिम महिलेला तिच्या अल्पवयीन मुलांचा ताबा मिळण्याचा अधिकार असेल.

# बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६




**कलम- २ (अ) — विवाहाचे विधीसंमत वय-** व्यक्ती पुरुष असेल तर २१ वर्षे व व्यक्ती स्त्री असेल तर १८ वर्षे असे दिलेले आहे.

**कलम ९- बालकाशी विवाह करणाऱ्या प्रौढ पुरुषास शिक्षा.**

**कलम १०- बालविवाह विधीपूर्वक लावल्याबद्दल शिक्षा-** जो कोणी, बालविवाह पार पाडेल, बाल विवाहास अपप्रेरणा देईल, बाल विवाहाचे संचालन करेल, तो या कलमाअन्वये अपराधी असेल.

**कलम ११- बालविवाह विधीपूर्वक करण्यास प्रोत्साहन दिल्याबद्दल किंवा परवानगी दिल्याबद्दल शिक्षा**

- बालकाचे पालन करणारी व्यक्ती मग ती आई/वडील किंवा पालक असणारी व्यक्ती कायदेशीर किंवा बेकायदेशीर बाल विवाहाचा करार करतेवेळी प्रोत्साहन/ कृती करेल/ सहभागी होईल/ विवाहास प्रतिबंध करण्यास निष्काळजीपणे कसूर करेल ती या कलमान्वये अपराधी असेल.
- या कायदयान्वये बालविवाहाची व्यवस्था करण्यास जो कोणी दोषी असेल अशा कोणत्याही प्रौढ व्यक्तीस २ वर्षांची शिक्षा, एक लाखांपर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होवू शकतात.

➢ जेव्हा कोणालाही बालविवाह करण्यास भाग पाडले जाते तेव्हा ते पोलीसांची मदत घेवू शकतात.

➢ आपत्कालीन परिस्थितीमध्ये मदतीसाठी १०९८ आणि पोलीस नियंत्रण कक्ष क्र ११२ वर संपर्क साधावा.

➢ ग्रामसेवक आणि बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडे बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. अंगणवाडी ताई त्यांना सहाय्यक म्हणून मदत करतात.

## बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५

या कायदयाअन्वये कलम २ - मुल म्हणजे १८ वर्षांच्या आतील व्यक्ती होय.
या कायदयाअन्वये बाल संरक्षण म्हणजे- मुलांचे शारीरिक, मानसिक, आर्थिक, भावनिक तसेच लैंगिक शोषणापासून संरक्षण करणे होय. मुलांना त्यांचे अधिकारांचा वापर अधिकाअधिक वापरता येईल याकरिता तसे वातावरण निर्माण करणे ही मोठया व्यक्तींची जबाबदारी आहे.

- उपेक्षित राहण्यापासून, पिळवणूक होण्यापासून, कोणत्याही प्रकारची इजा होण्यापासून, कोणत्याही छळापासून बालकांचे संरक्षण करणे.

- प्रकरण २ कलम ३(व्ही) – नुसार मुलांचे संरक्षण करणे ही कुटुंबाची पहिली जबाबदारी आहे. जर कुटुंब सक्षम नसेल तर शासन व पोलीस यांची जबाबदारी आहे.

कलम ७४- बालकाची माहिती कोणत्याही माध्यमातून उघड करण्यावर बंदी आहे.

कलम ७५- बालकांना जाणीवपूर्वक सोडून दिले, गैर कृत्य केले, शारीरिक-मानसिक त्रास दिला, बालकाला क्रूरपणे वागणूक दिली तर गुन्हा होतो.

कलम ७६- बालकांना भिक मागण्यास वापरणे गुन्हा आहे.

कलम ७७/७८- जो कोणी बालकास गुंगीकारक मद्य किंवा अंमली पदार्थ किंवा मनावर प्रभाव करणारे पदार्थ देणाऱ्यास शिक्षा आणि विक्री, तस्करी, पूरवठा किंवा बाळगण्यासाठी लावणाऱ्यास शिक्षा.

कलम ७९- बालकास कामाला ठेवल्यास वेठबिगारी करवून घेवून त्याच्या कामाचा मोबदला स्वत:जवळ ठेवून घेतल्यास गुन्हा होतो.

कलम ८०- विहीत कार्यपध्दती पुर्ण न करता कोणतीही संस्था अथवा व्यक्तीने ताब्यातील मुल दत्तक विधानासाठी देईल, स्विकारेल या कायदयाअन्वये त्यांना शिक्षा होवू शकते.

## बाल कामगार (प्रतिबंध व नियमन) कायदा १९८६

- १४ वर्षांखालील मुलांना कामावर ठेवण्यास प्रतिबंध करणे हे या अधिनियमाचे मुख्य उद्दिष्ट आहे.
- १४ वर्षांखालील कोणत्याही मुलांना धोकादायक उद्योगांमध्ये व हानिकारक प्रक्रियांमध्ये कामावर ठेवण्यास हा कायदा प्रतिबंध करतो.
- हा कायदा मुलांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यास हानिकारक मानले गेलेल्या १६ व्यवसाय व धोकादायक समजल्या गेलेल्या ६५ प्रक्रियांमध्ये मुलांना कामावर ठेवण्यास मनाई करतो. तसेच ज्या आस्थापनांमध्ये मुलांना कामावर ठेवण्यास परवानगी देण्यात आलेली आहे, अशा सर्व कारखान्यांवर हा अधिनियम नियंत्रण ठेवतो.
- या अधिनियमाच्या कक्षेमधून कुटुंबे व प्रशिक्षण संस्थांना वगळण्यात आले आहे.
- नियमभंग करणाऱ्यास ३ महिने ते १ वर्षापर्यंतचा तुरूंगवास व द्रव्यदंड.

## लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२

कलम ३-६ : मुख, योनी, मूत्र मार्ग किंवा गुद्दद्वारामध्ये कोणतीही वस्तू समाविष्ठ करणे तशी कृती करणे हा या कायदयाने गुन्हा आहे.

कलम ११-१२ : लैंगिक हेतूने केलेली कोणतीही कृती ज्यात शारीरिक स्पर्श समाविष्ट आहे पण ती भेदक (पेनिट्रेटीव्ह) नसेल.

कलम ७-१० : लैंगिक हेतूने कोणतेही शब्द, आवाज, हावभाव वापरणे, शरीराच्या अवयवांचे प्रदर्शन करणे, मुलाचे लैंगिक सुखासाठी शारीरिक निरीक्षण करणे, लैंगिक कृतीचा मुलाचा व्हिडीओ वापरण्याची धमकी देणे, मुलाला अश्लिल साहित्य दाखवणे.

- पोर्नोग्राफी करिता मुलाचा खाजगी किंवा सार्वजनिक रित्या वापर करणे.

## बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९

- केंद्र सरकारने सन २००२ च्या ८६ व्या संविधान विशोधन अधिनियमान्वये अनुच्छेद २१(ए) अन्वये प्राथमिक शिक्षणाचा मूलभूत अधिकारामध्ये समावेश केला आहे.

- त्यानुसार ६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण पुरवण्याची, त्यांना शाळांमध्ये प्रवेश देण्याची, उपस्थितीची आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याची जबाबदारी शासनाने स्वीकारली आहे.



# माता-पिता व जेष्ठ नागरिक यांचा निर्वाह व कल्याण अधिनियम २००७

या कायदयामध्ये जेष्ठ नागरिक अथवा माता-पिता यांना त्यांच्या मूलभूत गरजा व सुविधा त्यांची मुले देत नसल्यास अगदी त्यांना आई वडिलांकडून प्राप्त मालमत्तेचे हस्तांतरण सुध्दा रद्द करण्यासंदर्भांत या कायद्यात तरतूद करण्यात आली असून मासिक निर्वाह भत्ता प्राप्त करण्यासाठी सुध्दा तरतूद करण्यात आलेली आहे.

- केवळ माता पिता नाही तर अपत्यहीन व्यक्तीसही या कायद्यान्वये संरक्षण दिले आहे. अपत्यहीन व्यक्ती की त्याची संपत्ती अशा नातेवाईकांच्या ताब्यात आहे किंवा अशा अपत्यहीन व्यक्तीच्या निधनानंतर त्या व्यक्तीच्या संपत्तीचा ताबा ज्या नात्याच्या व्यक्तीकडे जाणार आहे त्यांना सुध्दा या कायदयाअंतर्गत संरक्षण देण्यात आलेले आहे.
- माता-पिता आजी आजोबा यांना आपल्या अज्ञानवयीन नसणा-या एका किंवा अधिक मुलांविरूध्द निर्वाह भत्ता अर्ज स्वत: किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीला अथवा एखादया नोंदणीकृत संघटनेस न्यायाधिकरणाकडे करता येईल.

- <u>तक्रार कोठे करायची ?</u>

➢ कोणत्याही मुलाविरूध्द किंवा नातेवाईकाविरूध्द ती व्यक्ती जिथे राहते किंवा शेवटी राहत आहेत अशा कोणत्याही जिल्हयातील न्यायाधिकरणाकडे करता येईल.

➢ विदेशात राहणा-या मुलांच्या/नातेवाईकांच्या विरोधात तक्रार करण्याची तरतूद.

➢ जास्तीत जास्त १०,०००/- इतका मासिक भत्ता निर्धारित करता येतो.

➢ न्यायाधिकरणाच्या आदेशाच्या ६० दिवसाच्या आत अपील करण्याच अधिकार.

➢ जेष्ठ नागरिकाचा परित्याग करणे किंवा त्याला उघडयावर सोडून देणे या विरोधात शिक्षा.

# २. महिलांचे हक्क व महत्त्वाचे अधिकार




आजच्या धकाधकिच्या युगात महिलांबाबतच्या गुन्हयांत प्रचंड वाढ होत आहे. असे गुन्हे कमी व्हावेत याकरिता कायदा हा जास्त कडक करणे आवश्यक आहेच परंतु महिला सबलीकरण आणि महिलांना कायदेशीर साक्षर करण्याकरिता महिलांना त्यांचे हक्क व अधिकार माहित असणे देखिल आवश्यक आहे.

- <u>**मोफत मदत मिळण्याचा अधिकार :-**</u>

महिला या जेव्हा पोलीस ठाण्यात येतात तेव्हा त्यांची तक्रार नोंदवून घेवून त्याची एक प्रत त्यांना मोफत देणे पोलीसांना बंधकारक आहे. तसेच एखादया महिलेवर बलात्कारासारखा प्रसंग ओढावल्यास तिला मोफत वैदयकिय मदत देवून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विधी सेवा प्राधिकरणास तात्काळ कळवावे. त्यांनतर विधी सेवा प्राधिकरणाच्या कायदेशीर संस्थेच्या मदतीने महिलेला मोफत वकिल दिला जातो तसेच इतर मदत पुरवली जाते.

- <u>**गोपनीयतेचा अधिकार :-**</u>

बलात्कारासारखा गुन्हा एखादया महिलेसोबत घडल्यास तिचे नाव पोलीसांकडून अथवा मीडियाचे मार्फतीने उघड केले जावू नये. याबाबत महिलेला गोपनीयतेचा

अधिकार आहे. भारतीय दंड संहिता कलम २८८(अ) अन्वये पीडितेचे नाव उघड करणे, नाव छापणे, प्रकाशित करणे, एखादया महिलेचे नाव उघड होईल अशी कोणतीही बाब कायदयाने गुन्हा आहे. बलात्कार पीडित महिलेचा जबाब कोणीही ऐकू नये म्हणून न्यायदंडाधिकारी यांचे समोर खाजगीत तिचा जबाब नोंदविण्याचा अधिकार आहे. महिला अधिकारी/अंमलदार यांचे समक्षच तिचा जबाब नोंदविण्याचा तिला अधिकार आहे.

- **<u>कोणत्याही वेळी तक्रार नोंदविण्याचा अधिकार :-</u>**

महिला पोलीस ठाण्यात तक्रार देण्याकरिता उशीरा का आली याच्या मागे अनेक कारणे असू शकतात. महिलांवर अनेक प्रकारचा दबाव असू शकतो असे कायदा मानतो. स्वत:ची प्रतिष्ठा, घरच्यांची प्रतिष्ठा, जीवे ठार मारण्याची धमकी अशा कोणत्याही दबावाला ती बळी पडलेली असू शकते. त्यामुळे ती पोलीस ठाण्यात उशीरा आली यामूळे तिची तक्रार घेण्यास पोलीस नकार देवू शकत नाही. महिला घटना घडून गेल्यानंतर कधीही तक्रार देण्यास आली तर तिची तक्रार नोंदवून घेणे पोलीसांना बंधनकारक आहे.

- **<u>ऑनलाईन तक्रार करण्याचा अधिकार :-</u>**

महिला तसेच इतर नागरिक देखिल ईमेलव्दारे किंवा नोंदणीकृत पोस्टद्वारे त्यांची तक्रार पोलीस ठाण्यात अथवा वरिष्ठ अधिकारी कार्यालयात पाठवू शकतात. महिलेची तक्रार प्राप्त होताच तिला संपर्क साधून तिच्या इच्छित स्थळी जावून महिला पोलीस अधिकारी/अंमलदार तिचा जबाब नोंदवून तिची तक्रार दाखल करतील. तिच्या जबाबावरुन एफ.आय.आर दाखल करता येतो.

- **<u>शून्य एफ.आय.आर करण्याचा अधिकार :-</u>**

महिला, बालके व जेष्ठ नागरिकांच्या संदर्भात घटना कोठेही घडलेली असो दखलपात्र गुन्हयात शून्य एफ.आय.आर दाखल करण्याचा अधिकार आहे. सदरवेळी पोलीस त्यांना घटना जिथे घडली त्या पोलीस ठाण्यात जाण्यास सांगू शकत नाही. महिलांना त्यांचे जवळच्या पोलीस ठाण्यात जावून तात्काळ गुन्हा नोंदविता येतो.

पोलीसांनी जर तो त्यांचे स्थळसीमेत येत नसेल तर शून्य एफ.आय.आर नोंदवून योग्य त्या कायदेशीर मार्गाने ज्या पोलीस ठाण्याच्या स्थळसीमेत घटना घडली त्यांना शून्य एफ.आय.आर वर्ग करावा.

- **अटक न करण्याचे अधिकार :-**

सर्वोच्च न्यायालयाचे मार्गदर्शक तत्त्वांनुसार सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयापूर्वी महिलेला अटक करता येत नाही. पोलीसांसोबत महिला अंमलदार असली तरी पोलीस महिलेला रात्री अटक करू शकत नाही. जर महिलेने गंभीर स्वरूपाचा गुन्हा केला असेल तर पोलीस रात्रीच्या वेळी महिलेस अटक करणे का आवश्यक आहे हे दंडाधिकाऱ्यांना सांगून त्यांचेकडून लेखी आदेश प्राप्त करून घेणे आवश्यक आहे.

- **पोलीस ठाण्यात न बोलावण्याचा अधिकार :-**

एखादया महिलेने केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तिच्याकडे चौकशी करण्याकरिता तिला पोलीस ठाण्यात हजर राहणे बंधनकारक नाही. सदरवेळी महिला तिच्या इच्छित स्थळी तिच्या नातेवाईकांसमक्ष तिचे म्हणणे मांडू शकते. तिचा जबाब तिच्या इच्छित स्थळी महिला अधिकारी/अंमलदार यांचे समक्ष नोंदवून एफ.आय.आर दाखल करता येवू शकते.

- **वैदयकिय स्थिती नाही तरी गुन्हा दाखल करण्याचा अधिकार :-**

डॉक्टरांनी बलात्कार झालाच नाही असे जरी म्हटले तरी बलात्काराची केस फेटाळता येत नाही. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १६४ (अ) नुसार बलात्काराच्या पीडितेची वैदयकिय तपासणी करणे आवश्यक आहे. आणि वैदयकिय अहवाल हा केवळ पुरावा म्हणुन काम करू शकतो. पीडित स्त्रीला डॉक्टरांकडून मोफत वैद्यकिय अहवालाची प्रत मिळण्याचा अधिकार आहे. बलात्कार हा गुन्हा आहे वैद्यकिय स्थिती नाही. ही कायदेशीर संज्ञा आहे आणि पीडितेवर उपचार करणाऱ्या वैद्यकिय अधिकाऱ्याने निदान केले पाहिजे असे नाही. नुकत्याच झालेल्या लैंगिक कृत्याचा पुरावा आहे हे वैद्यकिय अधिकाऱ्याकडून एकच विधान केले जावू शकते. बलात्कार झाला की नाही हा कायदेशीर निष्कर्ष आहे आणि डॉक्टर यावर निर्णय घेवू शकत नाहीत.

## ● लैंगिक छळ न करण्याचा अधिकार :-

सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे अनुषंगाने खाजगी/सरकारी/निम्न सरकारी संस्थेमध्ये जिथे महिला काम करतात अशा कामाच्या ठिकाणी महिलांकरिता लैंगिक छळ तक्रार समिती तयार करणे हे त्या संस्थेच्या प्रत्येक वरिष्ठांचे कर्तव्य आहे. अशी समिती गठीत करणे कायदयाने बंधनकारक आहे. या समितीचे अध्यक्ष एक महिला असणे आवश्यक आहे आणि त्यात ५० टक्के महिलांचा समावेश असणे आवश्यक आहे. सदर सदस्यांपैकी एक महिला सदस्य कल्याणकारी गटातील असावी.

## ■ विवाहित स्त्रीकडे असलेले कायदेशीर हक्क –

१. सासरच्या किंवा नवऱ्याच्या घरी राहण्याचा व घटस्फोटाचा अधिकार.

२. स्त्रीधन व मुलांची कस्टडीचा अधिकार.

३. गर्भपात करण्याचा अधिकार.

४. माहेरच्या संपत्तीवर अधिकार.

५. घरगुती अत्याचाराविरोधात केस करण्याचा अधिकार.

६. हुंडयाच्या मागणी विरोधात तक्रार करण्याचा अधिकार.



# ३. बालकांचे हक्क व अधिकार



- **<u>बालकांचे अधिकार-</u>**

➢ **जगण्याचा अधिकार-** प्रत्येक मुलास जन्म घेण्याचा, जगण्याचा, योग्य आहार व लसीकरणाचा, आरोग्याच्या सोयी सुविधा मिळण्याचा अधिकार आहे.

➢ **विकासाचा अधिकार-** शिक्षणाचा अधिकार, खेळण्याचा अधिकार, कौशल्यपूर्ण शिक्षणाचा प्रत्येक बालकास अधिकार आहे.

➢ **संरक्षणाचा अधिकार-** लैंगिक अत्याचारापासून संरक्षण, बालमजूरी, बालविवाह, व्यसनमुक्ती, ऑनलाईन होणारा छळ, अशा सर्व प्रकारच्या अत्याचारांपासून बालकांना संरक्षण मिळणे हा त्यांचा अधिकार आहे.

➢ **सहभागाचा अधिकार-** आपले मत मांडण्याचा, त्यांचे म्हणणे ऐकूण घेण्याचा प्रत्येक बालकास अधिकार आहे.

वरील सर्व अधिकार हे बालकांचे मूलभूत अधिकार आहेत. हे सर्व अधिकार आपण सुजाण नागरिक या नात्याने बालकांना पुरवणे आपल्याला बंधनकारक आहे. ही आपल्या सर्वांची सामाजिक व नैतिक जबाबदारी आहे.

- **बाल लैंगिक शोषण-**

बाल लैंगिक शोषण म्हणजे अशी कोणतीही कृती ज्यात ताकदवान व्यक्ती स्वतःच्या लैंगिक समाधानासाठी मुलाचा वापर करते.

➢ बालकाला अनुचित प्रकारे शेरेबाजी करणे, धमकावणे, छेडछाड करणे, लैंगिक शेरेबाजी करणे, अपमानास्पद वागणूक देणे.

➢ लिंग आणि योगी संभोग, गुदव्दार संभोग, मौखिक संभोग.

➢ मुलाच्या खाजगी अवयवांना स्पर्श करणे, मोठया व्यक्तीच्या खाजगी अवयवांना स्पर्श करायला लावणे.

➢ मुलासोबत लैंगिक संभोगाबद्दल, लैंगिक क्रियेबद्दल बोलणे, लैंगिक टिपण्ण्या करणे.

- लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण, अधिनियम २०१२ या कायदयातील महत्त्वाचे मुद्दे-

■ हा कायदा १८ वर्षाच्या आतील सर्व मुला-मुलींसाठी लागू आहे.

■ या कायदयात निरपराधपणा सिध्द करण्याची जबाबदारी आरोप असणाऱ्या व्यक्तीची आहे.

■ या कायदयाच्या तरतूदींनुसार या कायदयाच्या केसेस विशेष न्यायालयात चालवल्या जातात.

■ या कायदयात खटला चालवण्याची कार्यपध्दती सांगितलेली आहे.

- लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण, अधिनियम २०१२ या कायदयासोबतच आवश्यतेनुसार-

➢ कौटुंबिक हिंसाचार आणि त्यातील तरतुदी

➢ बालविवाह प्रतिबंध कायदा २००६ मधील तरतुदी

➢ बाल न्याय मुलींची काळजी आणि संरक्षण अधिनियम २०१५ मधील तरतुदी या सगळया कायदयांची सांगड घालत बळीत बालकास न्याय्य प्रक्रियेत मदत करता येते.

■ या कायदयात स्पर्श आणि स्पर्शाशिवाय बालकांसोबत होणाऱ्या सर्व प्रकाराच्या अत्याचाराचा यात समावेश केलेला आहे.

■ मुलांवरील लैंगिक आघात, लैंगिक छळ, लैंगिक समागमन, अधिक गंभीर लैंगिक गुन्हे, विकृत पध्दतीने केलेले लैंगिक अत्याचार, अश्लील चित्रफित मुलांना दाखवणे किंवा मुलांचा वापर करून साहित्य तयार करणे, फोटो घेणे, या प्रकारचे साहित्य जवळ बाळगणे या सर्व प्रकारच्या गुन्हयांची दखल या कायदयात घेण्यात आलेली आहे.

■ लैंगिक शोषण करणारी व्यक्ती ही पोलीस, लष्करी अधिकारी, सुरक्षा अधिकारी, वैदयकिय अधिकारी, शैक्षणिक आणि धार्मिक संस्थेशी संबंधित असेल तर मुलांच्या

■ निवासी संस्थेतील पदाधिकारी किंवा कर्मचारी अशा कोणत्याही जबाबदारीच्या पदावर असणारी व्यक्ती किंवा बालकाचा ताबा ज्या व्यक्तीकडे आहे या पैकी कोणत्याही व्यक्तीकडून बालकाचे लैंगिक शोषण झाल्यास कायद्यात कडक शिक्षेची तरतूद आहे.

■ लैंगिक छळवणूक झाल्याची माहिती पोलीसांना मिळताच तात्काळ गुन्हा दाखल करून बळीत बालकास सुरक्षित करणे आवश्यक आहे.

■ बालकाच्या लैंगिक छळवणूकीची तक्रार बळीताच्या घरातील कुणीही व्यक्ती किंवा स्वत: पोलीस अशी तक्रार दाखल करून घेवू शकतात.

■ बालकाची लैंगिक छळवणूक झाल्याचे माहित असताना देखिल ते पोलीसांपासून लपवून ठेवणे या कायदयान्वये गुन्हा आहे.

■ गुन्हयाच्या गांभीर्यावर आधारित आरोपीस जन्मठेप, तुरूंगवास, द्रव्यदंड आणि इतर अशा शिक्षेची तरतूद या कायदयाअंतर्गत केलेली आहे.



# ४. जेष्ठ नागरिकांचे हक्क व अधिकार

कुटुंब संस्थेच्या पारंपरिक साच्यात आधुनिक काळात झालेले बदल लक्षात घेता कुटुंबातील वृध्दांचे स्थान व त्यांची देखभाल हे खूप अडचणीचे ठरू लागले आहे. वृध्दांचे प्रश्न दिवसेंदिवस वाढत चाललेले आहे. वृध्दांच्या भरणपोषणाचा मुद्दा कळीचा होत चालला आहे. शहरांमध्ये राहण्यासाठी उपलब्ध अपुऱ्या जागा, महागाई, विभक्त कुटुंबपध्दती इ. मूळे घरात वृध्दांना ठेवणे अडचणीचे वाटू लागले आहे. त्यातच आपापसांत न पटणे, मालमत्ता-पैसा-जमिन जूमला इ. संदर्भात लोकांमध्ये भांडणे वाढत चालली आहेत. त्यामुळे अशा परिस्थितीमध्ये वृध्दांनी राहणे म्हणजे एक ओझे वाटत आहे.

➢ अशा परिस्थितीमध्ये वृध्द माणसे अनेकदा अत्याचाराला बळी पडतात. जिथे विश्वासाचे नाते /अपेक्षा असते त्याला तडा जाणारी व वारंवार घडणारी कृती, ज्यामुळे वृध्द व्यक्तीस शारीरिक/मानसिक/भावनिक/आर्थिक इजा अथवा दु:ख होते त्याला वृध्द व्यक्तीवर होणारा अत्याचार असे म्हणता येईल.

➢ असे अत्याचार गरीब,मध्यमवर्गीय, श्रीमंत, सुशिक्षित, अशिक्षित, कोणत्याची जाती-धर्माच्या वृध्दांसोबत घडू शकतात. अनेकदा वृध्दांना तिर्थक्षेत्री, मोठया शहारांमध्ये अगर वृध्दाश्रमांमध्ये सरळ सोडून दिले जाते. त्यांच्याशी सर्व प्रकारचे संबंध तोडण्यात येतात. त्यांना घराबाहेर हकलून दिले जाते. अडगळीच्या जागेत ठेवले जाते. असे प्रकार आपल्याला सर्रास घडताना दिसतात.

- <u>वृध्दांवर खालील प्रकारचे अत्याचार केले जातात-</u>

१. शारिरीक छळ

२. मानसिक छळ/भावनिक छळ (यात शिवीगाळ याचा अंतर्भाव)

३. आर्थिक स्वरूपाचे/वस्तूंशी निगडीत शोषण

४. दुर्लक्ष करणे

५. लैंगिक छळ

६. वृध्द व्यक्तीचा त्याग करणे

- **<u>वृध्द व्यक्तींवर होणाऱ्या अत्याचारांविषयी राष्ट्रीय सांख्यिकी विभागाच्या आकडेवारीनुसार</u> :-**

➢ जवळपास ५० टक्के वृध्द हे आर्थिकदृष्टया परावलंबी आहेत.

➢ ३५ टक्के वृध्दांना अत्याचाराच्या कोणत्या न कोणत्या प्रकाराला सामोरे जावे लागत आहे.(अनादर, दुर्लक्षित, शिवीगाळ, आर्थिक शोषण इ.)

➢ ४० टक्के वृध्दांना आपण दुर्लक्षित आहोत असे वाटते. आपले कुटुंबिय आपल्याकडे लक्ष न देता त्यांच्या कामात व्यस्त आहेत असे वाटते.

➢ ५० टक्के पेक्षा जास्त वृध्दांना त्यांच्यावर अत्याचार होत आहेत याची जाणीवच होत नाही. भीती पोटी ते कोणालाही मदत मागत नाहीत. तसेच समाज काय म्हणेल व भविष्यात आणखी अत्याचार होतील या भीतीने वृध्द त्यांच्यावरील अत्याचार लपवताना दिसतात.

➢ तीन पंचमांश वृध्दांचे मासिक उत्पन्न १०,०००/- रूपयांपेक्षा कमी आहे.

➢ ५७ टक्के पेक्षा जास्त वृध्द आपल्या मुलांवर आर्थिक दृष्टया अवलंबून आहेत.

➢ अत्याचार करणारे लोक घरातीलच असतात.(मुलगा, सून, मुलगी, जावई इ.) काही ठिकाणी नोकरांकडून अत्याचार होतात. बऱ्याचदा अत्याचार होण्याचे कारण प्रॉपर्टी विषयक वाद, मतभेद इ. असतात.

➢ वृध्दांविषयी कायदे, योजना, कल्याण कार्यक्रम तसेच मदत करणाऱ्या संघटना, त्यांची भूमिका, कार्य याबाबत वृध्दांमध्ये जागरूकतेचे प्रमाण तुलनेने खूप कमी आढळते.

- **<u>वृध्दांवरील अत्याचार कमी होण्यासाठीचे उपाय</u> :-**

१. वृध्दांना नियमित व पुरेसे उत्पन्न असणे आवश्यक.

२. कुटुंबियांसोबतचे मतभेद मिटवणे /तडजोड करणे.

३. आर्थिक परावलंबित्व टाळण्यासाठी स्वत:च्या मालकीची प्रॉपर्टी बाळगणे.

४. मानसिक आधार, मदत यासाठी आवश्यकतेनुसार वृध्दांचे व कुटुंबियांचे समुदपशेन.

- **<u>वृध्दांना मदत कोठे मिळू शकते ?</u>**

➢ मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयामध्ये "भरोसा सेल" येथे वृध्दांना कायदेतज्ञांची मोफत मदत मिळू शकते. त्यांना वैदयकिय मदत तसेच इतर संस्थांच्यावतीने मदत मिळवून दिली जाते.

➢ न्यायाधिकरणाकडे निर्वाह अर्ज कसा करावयाचा याची संपूर्ण माहिती भरोसा सेल येथे उपलब्ध होते.

➢ वृध्दांना तात्काळ पोलीस मदत नियंत्रण कक्षाकडून दिली जाते. त्याकरिता डायल-११२ या नंबरवर संपर्क साधून मदत मागता येते.



## ५. एफ.आय.आर कसा व कुठे नोंदवावा ?




प्रत्येक नागरिकाला आपली तक्रार कुठल्याही जवळच्या पोलीस ठाण्यात नोंदविता येते. महिला, बालके व जेष्ठ नागरिकांच्या बाबतीत घटना कोणत्याही पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली असेल तरी, पोलीस तक्रारदारास त्याच जवळच्या पोलीस ठाण्यात जा, अशी सक्ती करु शकत नाही. नागरिकाला आपली तक्रार कोणत्याही पोलीस ठाण्यात नोंदविता येते. तक्रार नोंदवून घेवून ती योग्य त्या पोलीस स्टेशनमध्ये वर्ग करण्याची जबाबदारी पोलीसांची आहे.

- **तक्रार कशी नोंदविता येते ?**

जर एखादया व्यक्तीला तक्रार नोंदवायची असेल, तर त्याला पोलीस स्टेशनमध्ये प्रत्यक्ष जावून तक्रार नोंदविता येवू शकते. एखादा तक्रारी अर्ज जर करावयाचा असेल तर इंटरनेटवर उपलब्ध वेबसाईटवर जावून ऑनलाईन तक्रारी अर्ज सादर करता येतो. मिरा-भाईंदर,वसई विरार आयुक्तालयाच्या वेबसाईटवर जावून लॉस्ट ॲण्ड फाऊंड मध्ये गहाळ झालेल्या वस्तूंची तक्रार ऑनलाईन नोंदविता येते. एखादी तक्रार पोलीस ठाण्याला दाखल झाल्यानंतर ती दखलपात्र असो अथवा अदखलपात्र त्याची एक प्रत तक्रारदार यांना नि:शुल्क तात्काळ देणे पोलीसांना बंधनकारक आहे. अदखलपात्र गुन्हयात पोलीसांना कोर्टाच्या आदेशाविना तपासाचे अधिकार नसतात.

- **महिला तक्रारदार-आरोपी :-**

महिलांच्या तक्रारींची तात्काळ दखल घेवून पोलीसांनी त्याची चौकशी/तपास करून आरोपींना तातडीने अटक करणे. तपासात कुठलीही उणीव न ठेवता लवकरात लवकर कोर्टात खटला दाखल करणे पोलिसांना बंधनकारक आहे.

चौकशी, तपासादरम्यान किंवा जबाब नोंदविताना महिलेला लाज वाटेल, अपमान होईल किंवा त्यांच्या चारिञ्याबद्दल शंका निर्माण होईल किंवा त्यांच्या प्रतिष्ठेला बाधा येईल असे प्रश्न विचारता कामा नये.

महिलांना सुर्यास्तानंतर अटक करता येत नाही. तसेच चौकशीसाठी पोलिस स्टेशनमध्येही त्यांना आणल्यास त्यांच्या नातेवाईकांना त्यांच्यासोबत राहण्याची परवानगी देणे बंधनकारक आहे. त्यांनी महिलांना राखीव कक्षात ठेवणे अपेक्षित आहे.

- **आपली तक्रार नोंदवून न घेतल्यास-**

आपली तक्रार पोलीस स्टेशनमधील अधिकारी नोंदवून घेत नाही, अशी तक्रार असल्यास पोलीस स्टेशनमधील वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्याकडे दाद मागता येते. तसेच, विभागातील सहाय्यक पोलीस उपायुक्त, पोलीस उप आयुक्त, अतिरिक्त आयुक्त यांच्याकडेही तक्रारी विषयीची समस्या मांडता येते.

- **खोटी तक्रार देणे हा गुन्हा आहे.**

पोलीसांकडे खोटी तक्रार करणे हा गुन्हा आहे. गुन्हा दाखल करताना खोटी, अवास्तव माहिती देणे, पोलिसांची दिशाभूल करणे हा भारतीय दंड संहितेनुसार अपराध ठरतो. भा.दं.वि.स. १८६० कलम १८२ नुसार जी व्यक्ती सरकारी कर्मचा-याला जाणीवपुर्वक खोटी माहिती देईल त्याला सहा महिन्यांपर्यंत तुरूंगवास किंवा एक हजार रूपयांपर्यंतचा दंड किंवा दोन्ही शिक्षा होवू शकतात.

कलम २११ नुसारही अशा व्यक्तींवर कारवाई होवू शकते. ज्यात सात वर्षांपर्यंत शिक्षेची तरतूद आहे.

- तक्रारीकरिता संपर्क :

नियंत्रण कक्ष- ०२२-२९४५२१३५/ ०२२-२९४५२१३१
हेल्पलाईन क्रमांक- ०२२-३५००६१३०

## ■ विशाखा नियमावली :-

कामाच्या ठिकाणी महिलांना अनेकदा अवमानजनक भाषा, हेतूपुरस्सर स्पर्श, लैंगिक सुखाची मागणी इत्यादी त्रासाला सामोरे जावे लागते. अनेकदा महिला वर्ग भिती पोटी वा अन्य कोणत्याही कारणामुळे या छळाची तक्रार करण्यासाठी फारसा उत्सुक नसतो. त्यापेक्षा नोकरी बदलणे त्यांना अधिक सोयीस्कर वाटते. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ होवू नये यासाठी सर्वोच्च न्यायालयाने १९९७ मध्ये विशाखा गाईडलाईन्स जारी केल्या होत्या. महिलांचा छळ होत असेल तर त्याची अंतर्गत चौकशी करण्याकरिता विशाखा कमिटी स्थापित करण्याचे निर्देश कॉर्पोरेट कंपन्यांना देण्यात आलेले आहेत.

## ■ असा त्रास होत असेल तर-

१) लैंगिकतेवरून टोमणे मारणे, २) लगट करण्याचा प्रयत्न करणे, ३) शारीरिक स्पर्श करणे, ४) लैंगिक सुखाची मागणी करणे, ५) सर्वांदेखत अवमानित करणे असा त्रास होत असेल तर अंतर्गत विशाखा कमिटी समोर तक्रार दाखल करता येते.

## ■ तक्रार कशी करावी ?

कोणत्याही संस्थेतील महिलेशी असे गैरवर्तन होत असेल तर तीन महिन्याच्या आत तक्रार दाखल करावी. संस्थेची अंतर्गत विशाखा समिती मुदतवाढ ही देवू

शकते. नोकरीचा राजीनामा दिला असेल तर एका निश्चित कालमर्यादेतच तक्रार दाखल करणे गरजेचे असते.

- **विशाखा समितीची मार्गदर्शक तत्त्वे :-**

➢ नोकरी व व्यवसायाच्या ठिकाणी महिलांची लैंगिक छळवणूक होवू न देण्याची जबाबदारी ही मालकाची अथवा संबंधित अधिकारी वा व्यक्तीची असेल.

➢ सर्व सरकारी व निमसरकारी अथवा खासगी कामाच्या ठिकाणी "लैंगिक छळवणूक" म्हणेज काय, याची माहिती कामकाजाच्या ठिकाणी लावण्यात यावी व सर्व कर्मचाऱ्यांपर्यंत ती पोहचेल, अशी व्यवस्था करावी.

➢ जर लैंगिक छळवणूकीची घटना ही फौजदारी गुन्हा होत असेल, तर संबंधित अधिकाऱ्यांनी योग्य त्या ठिकाणी याची तक्रार तर नोंदवावीच, पण त्याचबरोबर पीडित महिलेस सर्व सुरक्षा पुरवावी.

➢ पिडीत महिलेस तिच्या इच्छित ठिकाणी बदली करून दयावी व संबंधित आरोपी कर्मचाऱ्याविरूद्ध नियमाप्रमाणे शिस्तभंगाची कारवाई सुरु करावी.

➢ सर्व सरकारी, निमसरकारी, खाजगी तसेच सार्वजनिक क्षेत्रातील कार्यालयात महिलांना होणाऱ्या लैंगिक शोषणाची तक्रार ऐकून निवाडा देण्यासाठी एक तक्रार निवारण मंच वा समिती असावी, त्यात ५० टक्के सदस्य महिला असाव्यात, स्वयंसेवी महिला संघटना, महिला आयोग यांचे प्रतिनिधी असावेत, तसेच कायदेतज्ञ, तक्रार करणारी स्त्री व ज्याच्याविरूद्ध तक्रार आहे तो पुरुष या दोघांच्याही खात्याचे प्रमुख त्या कमिटीत असावेत व स्त्रियांनी या कमिटीकडे आपली तक्रार मांडावी. या मंचापुढे जेव्हा एखादी महिला आपल्या

शोषणाबद्दल लेखी तक्रार करेल, तेव्हा समितीचे सदस्य तिची तक्रार व दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतील. सर्व रेकॉर्डस तपासतील. याव्दारे सत्य शोधून दोषी ठरलेल्या कर्मचाऱ्याची पगारवाढ थांबवणे किंवा त्याची त्वरीत बदली करणे अशा प्रकारच्या शिक्षा देवून प्रश्न सोडविता येतील. येथेही महिलेस न्याय न मिळाल्यास ती राज्य महिला आयोग किंवा न्यायालयात दाद मागू शकते.

- महिलेस तिची तक्रार पोलीस ठाण्यात जावून देखिल नोंदविता येईल.



## ६. महिला/बालके व जेष्ठ नागरिक यांचेकरिता राबविण्यात येणारे विविध उपक्रम

- **भरोसा सेल :-**

महिला, मुले व जेष्ठ नागरिक यांना एकाच ठिकाणी सर्व प्रकारची मदत व सुविधा मिळावी या उद्देशाने १ ऑक्टोबर २०२१ रोजी सहाय्यक पोलीस आयुक्त कार्यालय, पहिला माळा, भाईंदर पोलीस ठाणेच्या मागे, भाईंदर (प) येथे "भरोसा सेल"ची स्थापना करण्यात आली आहे.

○ **भरोसा सेल अंतर्गत मिळणाऱ्या सेवा :**

➢ तात्काळ पोलीस मदत

➢ समुपदेशन

➢ वैदयकिय सेवा

➢ विधिविषयक सेवा

- मानसोपचार तज्ञ
- पीडित महिलांचे पुर्नवसन
- कौटुंबिक हिंसाचार कायदयाअंतर्गत संरक्षण

○ <u>भरोसा सेलची कार्यपध्दती :-</u>

भरोसा सेल येथे पोलीस ठाणेकडून अथवा समक्ष प्राप्त झालेले अर्ज यांतील अर्जदार व गैरअर्जदार यांना समक्ष बोलावून त्यांचे समूपदेशन करण्यात येते. महिलांना, जेष्ठ नागरिकांना मोफत विधिविषयक सेवा दिली जाते. महिलांना कौटुंबिक हिंसाचाराअंतर्गत गुन्हा दाखल करण्याकरिता समुदपेशन केंद्राची मदत तात्काळ दिली जाते. एखादया पीडितेस राहण्याची सोय नसेल तर तिला आधारगृहाची मदत देवून तिचे पुर्नवसन करण्यात येते. वैदयकिय सेवा मोफत उपलब्ध करून दिली जाते. पीडितेला न्याय मिळेपर्यंत तिची तक्रार बंद न करता तिस संपुर्ण मदत दिली जाते. कुठलाही एकतर्फी निर्णय ताबडतोब घेतला जात नाही.

पत्ता- भरोसा सेल, सहाय्यक पोलीस आयुक्त यांचे कार्यालय, पहिला माळा,
भाईंदर पोलीस ठाण्याचे पाठीमागे, भाईंदर पश्चिम, जि. ठाणे
संपर्क क्रमांक- ०२२-२८०८०००६
ई-मेल आय.डी- ***bharosacell.mb-vv@mahapolice.gov.in***

■ <u>महिला सहाय्यता कक्ष :-</u>

प्रत्येक पोलीस ठाण्यात येणाऱ्या महिलेला तात्काळ मदत मिळावी, तिचे म्हणणे योग्य पध्दतीने ऐकून घेतले जावे त्याकरिता महिला सहाय्यता कक्ष प्रत्येक पोलीस ठाण्यात उभारण्यात आला आहे. सदर ठिकाणी महिला पोलीस अंमलदार या पोलीस ठाण्यात येणाऱ्या प्रत्येक महिलेचे म्हणणे ऐकून तिला योग्य ती मदत तात्काळ पुरवतात. महिलांना पोलीस ठाण्यात येताना

त्यांच्यातील संकोच दूर व्हावा व त्यांचे म्हणणे सहजतेने त्या बोलू शकतील हा या मागचा उद्देश आहे.

- **पोलीस काका/पोलीस दिदी :-**

प्रत्येक पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक त्यांचे हद्दीतील प्रत्येक शाळेवरती पोलीस अंमलदार ते सहाय्यक पोलीस उप निरीक्षक दर्जाचे अधिकारी पोलीस काका/पोलीस दिदी म्हणून नियुक्त करतात. पोलीस काका/पोलीस दिदी यांचे मोबाईल क्रमांक शाळेच्या दर्शनी भागामध्ये लावले जातात. लहान मुलांसोबत कोणी छेडछाड केली, शाळेच्या परिसरात कोणत्याही प्रकारची घटना घडली तर लहान मुले तात्काळ संपर्क साधू शकतात. अनेक वाईट प्रसंग यामुळे घडण्याचे टळू शकतात. शाळेममध्ये लहान मुलांकरिता गुड टच, बॅड टच, बालकांचे अधिकार व कायदे इ. बाबत बालकांची कार्यशाळा पोलीस काका/पोलीस दिदी आयोजित करतात. बालकांचे लैंगिक अत्याचारापासून सुरक्षा करणे, बालकांकरिता सुरक्षित वातावरण निर्माण करणे हा या मागचा उद्देश आहे.

- **डायल ११२ :-**

हा महिला/जेष्ठ नागरिक/सामान्य नागरिक यांचे करीता हेल्पलाईन क्रमांक आहे. या क्रमांकावर संपर्क करून अडचणीमध्ये असलेल्या नागरिकांना तात्काळ पोलीसांची मदत उपलब्ध होते. सदरची सेवा ही २४/७ सुरू असते.

- **दामिनी पथक :-**

मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयामध्ये एकुण ३ परिमंडळ असुन प्रत्येक परिमंडळमध्ये रात्रपाळी कर्तव्यावर “दामिनी पथक” नेमण्यात येते. सदर पथकामध्ये एक महिला अधिकारी व दोन महिला अंमलदार असतात. रात्री पोलीस ठाणे हद्दीमध्ये कोठेही महिला पोलीसांची मदत लागल्यास, कामावरून

एकटया घरी येणाऱ्या महिलांना मदत लागल्यास दामिनी पथक तत्परतेने एखादया महिलेस मदत करू शकते. या उदात्त उद्देशाने हा उपक्रम राबण्यात येत आहे.

- **बडी कॉप :-**

कम्युनिटी पोलिसिंग अंतर्गत मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयामध्ये महिलांच्या सुरक्षिततेसाठी बडी कॉप योजना सुरू करण्यात आलेली आहे. कामाच्या ठिकाणी तसेच कामावरून घरी जाताना किंवा घरून कामावर जाताना रस्त्यात महिला, युवतींचा शारीरिक छळ तसेच अश्लिल शेरेबाजी रोखण्यासाठी बडी कॉप योजना राबवण्यात येत आहे. त्यासाठी प्रत्येक पोलीस स्टेशन स्तरावर दोन ते तीन पोलीस अंमलदारांची नियुक्ती करण्यात आली असुन त्यांच्या माध्यमातून नोकरी तसेच इतर कोणतेही काम करणाऱ्या महिलांना सुरक्षा प्रदान करण्यात येत आहेत. राज्यभर शासकिय तसेच खाजगी कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या महिला व युवतींचा लैंगिक छळ झाल्याच्या घटना घडलेल्या आहेत. या ठिकाणांसोबतच त्या महिला घरी जाताना किंवा घरून कामावर येताना रस्त्यामध्ये त्यांचा छळ झाल्याच्या घटना घडलेल्या आहेत. हे प्रकार रोखण्यासाठी राज्याच्या पोलीस महासंचालकांनी कम्युनिटी पोलिसिंग अंतर्गत बडी कॉप ही योजना कार्यान्वित करून महिलांना सुरक्षा प्रदान करण्यास प्राधान्य देण्याचे निर्देश दिले होते. त्यावरून सदरची योजना ही राज्यात सर्वत्र राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत संबंधित पोलीस ठाण्याच्या हद्दीत रहिवासी असलेल्या महिला, खाजगी, शासकिय नोकरी किंवा इतर कोणतेही कामाकरिता असेल तर त्यांचा मोबाईल क्रमांक घेवून अशा महिलांचा व्हॉट्सॲप ग्रुप तयार करण्यात आलेला आहे. या ग्रुपच्या माध्यमातून महिलांना तात्काळ संदेश देणे त्वरित शक्य होत आहे. काम करणाऱ्या महिलांना सुरक्षा देणे व संरक्षित वातावरण निर्मिती करणे हा याचा उद्देश आहे.

- **जागरूक नागरिक :-**

कम्युनिटी पोलिसिंगच्या माध्यमातून प्रत्येक पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बिट कार्यप्रणाली अंतर्गत प्रत्येक बिट अधिकारी याने त्याचे बिट कार्यक्षेत्रातील सर्व सोसायटी सभासद यांचे व्हॉटस्ॲप ग्रूप तयार केलेले आहेत. या ग्रूपच्या माध्यमातून समाजातील जास्तीत जास्त लोकांपर्यंत तात्काळ पोहचणे शक्य होते. बिटमध्ये कोणतीही घटना घडली तर “जागरूक नागरिक” त्वरित त्याची माहिती व्हॉटस्ॲप ग्रुपवर टाकतात. याची मदत समाजातील सर्व स्तरांमध्ये होते. जागरूक नागरिक या योजनेअंतर्गत प्रत्येक पोलीस ठाण्यातील बिट अधिकारी त्याचे बिट कार्यक्षेत्रामध्ये वेगवेगळया सोसायटी, शाळा, कॉलेज, मॉल इ. ठिकाणी भेटी देवून तेथे बैठकी घेवून समाजामध्ये सोनसाखळी चोरी, सायबर क्राईम, अंमली पदार्थांचे सेवन न करणे, महिला व बालकांविषयक गुन्हे, बँक फ्रॉड इ. विषयांची माहिती देतात. त्यामुळे अनेक वाईट घटना घडण्यापासून लोकांना परावृत्त करता येते.

मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयामध्ये प्रत्येक पोलीस ठाण्याच्या प्रत्येक बिट अधिकारी यांनी व्हॉटस्ॲप ग्रुप तयार केले असुन कोरोना महामारीच्या काळात त्याचा खुप चांगला उपयोग झाल्याचे दिसून आले आहे. पोलीस व लोकांमध्ये सलोख्याची भावना निर्माण करण्याचे काम या जागरूक नागरिक योजनेतून घडून येताना दिसत आहे.

- **चाईल्ड हेल्प लाईन :-**

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयामध्ये बाल भिक्षेकरी, बालमजूरी, बाल लैंगिक शोषण, शारीरिक व लैंगिक अत्याचाराने पीडित मुले, शाळकरी तसेच वस्ती पातळी वरील मुलांसदर्भांत येणाऱ्या केसेस, त्याचप्रमाणे विधी संघर्षग्रस्त मुले, दुर्लक्षित मुले, रस्त्यावर रहाणारी मुले, घर सोडून पळून आलेली मुले अशा मुलांकरिता महिला व बाल विकास विभागाने “चाईल्ड

लाईन-१०९८” ही हेल्पलाईन चालविण्यासाठी सीसीडीटी या संस्थेची निवड केलेली आहे. त्यानुसार या हेल्पलाईनचे कामकाज सुरू आहे. सांभाळ व सुरक्षिततेची गरज असलेल्या मुलांसाठी चाईल्ड लाईन ही २४ तास मोफत, आपत्कालीन सहाय्यता करणारी राष्ट्रीय फोन सेवा आहे.

○ **संपर्क केव्हा साधाल-**

- ➢ जेव्हा आपण एखादे आजारी व एकटे मुल पहाल.
- ➢ एखादे मुल निवाऱ्याच्या शोधात पहाल.
- ➢ एखादे बेवारस किंवा हरवलेले मुल पहाल.
- ➢ रस्त्यावर एखादया मुलाचा छळ होताना पहाल.
- ➢ एखादया मुलाची मजूरी वेतन नाकारलेले पहाल.
- ➢ एखादे असहाय्य किंवा मदतीची गरज असलेले मुल पहाल.

अशा परिस्थितीमध्ये आपण चाईल्ड हेल्पलाईनवर संपर्क साधून त्वरित माहिती देवू शकता.

बालकांसाठी हेल्पलाईन- १०९८

## ■ सायबर सेल :-

आजच्या इंटरनेटच्या युगात सायबर क्राईम हे मोठया प्रमाणात वाढलेले आहे. आधुनिक काळात ही एक जागतिक समस्याच बनली आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे अशा गुन्हयांत महिला या मोठया संख्येने बळी ठरलेल्या दिसतात. त्यांच्या सुरक्षिततेलाच यामूळे धोका निर्माण झाला आहे.

■ **महिलांना सामना करावे लागत असलेले सायबर गुन्हे-**

- ➢ ई-मेलव्दारे होणार छळ/छेडछाड/मनात लज्जा उत्पन्न होणारे प्रकार
- ➢ सायबर स्टॉकिंग (**Stalking**), (इंटरनेटच्या माध्यमातून पाठलाग करणे)
- ➢ सायबर पोर्नोग्राफी (अश्लिल फोटोज पाठवणे/दाखवणे/पसरवणे इ.)

- ➢ सायबर डीफमेशन (इंटरनेटच्या वापरातून बदनामी करणे)
- ➢ मॉर्फिंग (संगणकाच्या माध्यमातून इंटरनेटवरील मजकूरामध्ये किंवा छायाचित्रांमध्ये फेरफार करणे)
- ➢ ई-मेल स्पूफिंग (ईमेलव्दारे होणारे विडंबन/टवाळी इ.)
- ➢ ई-मेलव्दारे धमकावणे, ब्लॅकमेल करणे, फसवणूक करणे इ. प्रकार

या करिता मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयामध्ये "सायबर सेल" ची स्थापना करण्यात आलेली आहे. महिला त्यांच्यासोबत घडलेल्या घटना या ऑनलाईन तक्रारीच्या माध्यमातून सायबर सेलकडे करू शकतात. सायबर सेलच्या ई-मेल आयडी वरती अशा तक्रारी नोंदविण्याची मुभा दिलेली आहे.

ई-मेल आय.डी - ***cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in***
संपर्क क्रमांक- ०२२- २८११०१३५
सायबर सेल व्हॉटस्ॲप क्रमांक- ९००४८८०१३५

- ▪ <u>पोलीस आयुक्तांची थेट भेट :-</u>

मिरा-भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्त नागरिकांच्या अडीअडचणी समजावून घेण्यासाठी आणि त्यांचे निवारण करण्यासाठी प्रत्येक कामाच्या दिवशी (सोमवार ते शुक्रवार) दुपारी ३.०० ते ०५.०० वा. त्यांचे कार्यालयात उपलब्ध असतात. या दरम्यान महिला, जेष्ठ नागरिक, नागरिक पोलीस आयुक्तांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्या अडचणी सांगू शकतात.

- ▪ पोलीस आयुक्त कार्यालयाचा पत्ता-

९ गौरव गॅलेक्सी, रामनगर, मिरारोड पश्चिम, मिरारोड- ४०११०७
ई मेल आयडी- ***<u>cp.mb-vv@mahapolice.gov.in</u>***

- <u>सखी वन स्टॉप सेंटर :-</u> (जिल्हा महिला व बाल विकास विभाग)

शारीरिक, मानसिक, लैंगिक, कौटुंबिक छळ, ॲसिड हल्ला किंवा सायबर क्राईम आदी अत्याचाराला बळी पडलेल्या महिलांना पोलीस, वकील, वैद्यकिय सल्ला व समूपदेश या उद्देशाने मदत करण्यासाठी महिला व बाल कल्याण विभागाच्या वतीने सखी वन स्टॉप सेंटर ठाणे येथे सुरू करण्यात आले आहे. सदर ठिकाणी आलेल्या महिलांचे समूपेशन करून त्यांच्या तक्रारींच्या अनुषंगाने त्यांना मार्गदर्शन करण्यात येते. गरजेनूसार महिलांना निवाऱ्याची सोय देखील या सेंटरच्या माध्यमातून केली जाते.

पत्ता-शिवाजी महाराज हॉस्पिटल(सामान्य रुग्नालय), कळवा, ता.जि.ठाणे
संपर्क क्र. ९८३४२४५४३०
महिला हेल्पलाईन- १०९१

- <u>समूपदेशन केंद्र :-</u> (जिल्हा महिला व बाल विकास विभाग)

जिल्हा महिला व बाल विकास विभाग, ठाणे यांचे वतीने भरोसा सेल, भाईंदर प येथेच समूपदेशन केंद्र चालवण्यात येते. सदर समूपदेशन केंद्राच्या मदतीने महिलांना कौटुंबिक हिंसाचारा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात मदत केली जाते. तसेच महिलांना आधारगृह पुरवणे, त्यांचे पुर्नवसन करणे इ. मदत पुरवल्या जातात.

समूपदेशक- श्री. प्रदिप अनसरवाडकर मोबाईल क्र. ९९८७९३००९८
श्रीमती हर्षला गायकवाड मोबाईल क्र. ९५९४७५८९९९

- <u>महिला आयोग :-</u>

महिलांना संवैधानिक व न्यायिक सुरक्षा आणि अधिकार देण्यासाठी ३१ जानेवारी १९९२ रोजी महिला आयोगाची स्थापना झाली. प्रत्येक राज्यातही महिला आयोग स्थापन झाला आहे. महिला कोणतीही तक्रार थेट महिला आयोगाकडे करू शकतात. महिला सुरक्षा व महिलांविरोधात होणारे गुन्हे हा

अर्थातच त्यांच्या कामाचा महत्त्वाचा भाग आहे. या व्यतिरिक्त मालमत्ता वाद, ऑनलाईन फसवणूक, कामाच्या ठिकाणी होणारा छळ इ. बाबत महिला आयोगाकडे महिलांना तक्रार करता येते. महिलांशी संबंधित घटनांमध्ये स्वत:हून सहभाग घेण्याचा अधिकार महिला आयोगाला आहे. तसेच सरकारी आणि पोलीस यंत्रणांकडून माहिती मागवणे, स्वतंत्रपणे चौकशी करणे, साक्षीदारांना समन्स बजावणे, महिलांना न्यायालयीन प्रक्रियेमध्ये मदत देणे अशा गोष्टी आयोग करत असतात. पण आयोगाला दिवाणी न्यायालयाप्रमाणे चौकशीचे अधिकार असले तरी त्यांना खटला चालवण्याचे किंवा आरोपीतांना शिक्षा सुनावण्याचे अधिकार नाहीत.

■ महिला आयोगाचे अधिकार-

१. महिलांसबंधीच्या घटनात्मक आणि कायदेशीर तरतुदींचा आढावा घेणे.
२. आवश्यक वैधानिक दुरूस्ती सूचवणे.
३. तक्रार निवारण्यात सहाय्य करणे.
४. महिलांवर परिणाम करणाऱ्या सर्व धोररणांबद्दल सरकारला सल्ला देणे.

● राष्ट्रीय महिला आयोग, दिल्ली

संपर्क - +९१-११-२६९४४८८० / +९१-११-२६९४४८३

ई-मेल - आय.डी- ***complaintcell-ncw@nic.in***

● महाराष्ट्र राज्य महिला आयोग

पत्ता- गृहनिर्माण भवन, मेझानिन माळा,

गांधीनगर, बांदरा पुर्व, मुंबई- ४०००५१.

संपर्क क्रमांक- ०२२-२६५९२७०७

हेल्पलाईन क्रमांक- ०७४७७७२२४२४

ई-मेल आय.डी- ***mscwmahilaayog@gmail.com***

## ७. संपर्क कुठे साधावा ?

- **मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील पोलीस ठाणे :—**

१. मिरारोड पोलीस ठाणे- संपर्क क्र. ०२२-२८१२६७६७/ ८६५७९३६९४७
ई-मेल आय डी- ***pi.miraroad.mb-vv@mahapolice.gov.in***

२. भाईंदर पोलीस ठाणे- संपर्क क्र. ०२२-२८१९२२५७/ ८६५७९३६९५१
ई-मेल आय डी- ***pi.bhayandar.mb-vv@mahapolice.gov.in***

३. नयानगर पोलीस ठाणे- संपर्क क्र. ०२२-२८१२१२९९/ ८६५७९३६९४९
ई-मेल आय डी- ***pi.nayanagar.mb-vv@mahapolice.gov.in***

४. नवघर पोलीस ठाणे- संपर्क क्र. ०२२-२८०४४५७३/ ८६५७९३६९५२
ई-मेल आय डी- ***pi.navghar.mb-vv@mahapolice.gov.in***

५. काशिमीरा पोलीस ठाणे- संपर्क क्र. ०२२-२८४५७३०१/ ८६५७९३६९४८
ई-मेल आय डी- ***pi.kashimira.mb-vv@mahapolice.gov.in***

६. उत्तन पोलीस ठाणे- संपर्क क्र. ०२२-२८४५१००१/ ८६५७९३६९५३
ई-मेल आय डी-˙***api.utancostal.mb-vv@mahapolice.gov.in***

७. वसई पोलीस ठाणे- संपर्क क्र. ०२५०-२३२२१८८/ ८६६९६०४०१३
ई-मेल आय डी- ***pi.vasai.mb-vv@mahapolice.gov.in***

८. वालीव पोलीस ठाणे- संपर्क क्र. ०२५०-२४५४४००/ ८६६९६०४०१७
ई-मेल आय डी- ***pi.waliv.mb-vv@mahapolice.gov.in***

९. पेल्हार पोलीस ठाणे- संपर्क क्र. ०२५०-२९९१४००
ई-मेल आय डी- ***pi.pelhar.mb-vv@mahapolice.gov.in***

१०. माणिकपूर पोलीस ठाणे- संपर्क क्र. ०२५०-२३३२११०/ ८६६९६०४०१५
ई-मेल आय डी- ***pi.manikpur.mb-vv@mahapolice.gov.in***

११. विरार पोलीस ठाणे- संपर्क क्र. ०२५०-२५२८२२२/ ८६६९६०४०२१
ई-मेल आय डी- ***pi.virar.mb-vv@mahapolice.gov.in***

१२. तुळींज पोलीस ठाणे- संपर्क क्र. ०२५०-२४४११००/ ८६६९६०४०२८
ई-मेल आय डी- ***pi.tulinj.mb-vv@mahapolice.gov.in***

१३. नालासोपारा पोलीस ठाणे- संपर्क क्र. ०२५०-२४०२०३३/ ८६६९६०४०२७
ई-मेल आय डी- ***pi.nalasopara.mb-vv@mahapolice.gov.in***

१४. अर्नाळा पोलीस ठाणे- संपर्क क्र. ०२५०-२५८७२०८/ ८६६९६०४०२३
ई-मेल आय डी- ***pi.arnala.mb-vv@mahapolice.gov.in***

१५. आचोळे पोलीस ठाणे- संपर्क क्र. ०२५०-२९९०९५५/ ८६६९६०४०२९
ई-मेल आय डी- ***pi.achole.mb-vv@mahapolice.gov.in***

१६. सायबर सेल- *cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in* ०२२-२८११०१३५
नियंत्रण कक्ष- ०२२-२९४५२१३५/ ०२२-२९४५२१३१, नियंत्रण कक्ष व्हॉटसॲप नं. ८६५७९३६९४२
हेल्पलाईन क्रमांक- ०२२-३५००६१३०

------------------------------------------धन्यवाद !------------------------------------